Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4  ISSN:-2230-7850

**Research Papers**

# साहित्य आणि समाज : एक समाजशास्त्रीय दृष्टीकोण

*प्रा. डॉ. संजय दुधे*
समाजशास्त्र, विभाग प्रमुख
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोराडी,
नागपूर

## प्रस्तावना :—

अंतःसंबंध म्हणजे निकटचा संबंध होय. साहित्याचा समाजाशी जो संबंध आहे तो बाहय व उपरा नाही. साहित्यातून मानवी जीवनाचा बोध होतो. सामाजिक वास्तवता जाणून घेता येते. साहित्यिक ज्या परिस्थितीत जीवन जगतो ते साहित्यद्वारे कथन करतो. म्हणूनच अलिकडील काळात केवळ मनोरंजन हे साहित्याचे प्रयोजन होऊ शकत नाही, हा विचार सर्वमान्य झाला आहे. एकोणिसाव्या शतकात आधुनिक जाणिवेतून व दृष्टिकोणातून साहित्य निर्मीतीला, नवा आशय मांडण्याला सुरुवात झाली. त्यामुळे साहित्याद्वारे सामाजिक परिवर्तनाला आणि सामाजिक परिवर्तनाद्वारे साहित्य निर्मितीला चालना मिळाली.

साहित्य आणि समाज यातील परस्पर संबंधाच्या अनुबंधाद्वारे समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करता येतो. याची जाणिव झाल्याने अलिकडील काळात साहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास होत आहे. समाजशास्त्रात 'साहित्याचे समाजशास्त्र' (Sociology of Literature) ही ज्ञानशाखा उदयास आली आहे. हंगेरीयन समाजशास्त्र जार्ज लुकासने सर्वप्रथम 'साहित्याचे समाजशास्त्र' ही संज्ञा उपयोगात आणली. ऑगस्त कॉम्तने वैज्ञानिक दृष्टिकोणातून साहित्याचे अध्ययन केले.

---

विल्फ्रेडो पॅरेतोने तार्किक—अतार्किक घटकास प्राधान्य देऊन साहित्याच्या बोधासाठी अवशेष सिद्धांत मांडला. मॅक्स वेबरने आदर्श प्रारुपाद्वारे साहित्याचे विश्लेषण केले, तर एमिल डरखीमने साहित्य समाजाप्रमाणे तथ्य आहे असे प्रतिपादन केले. साहित्य ही व्यक्तीमुलक घटना नाही तर ती एक सामाजिक घटना आहे. ती केवळ व्यक्तीगत चेतनेचा परिणाम नाही तर 'सामुहिक चेतना' (collective consciousness) चा परिपाक आहे. या जाणिवेतून प्रस्तुत विवेचन पुढील उद्दिष्टांना अनुसरुन केले आहे.

1) साहित्याचे साहित्यीक नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून आकलन करणे.
2) साहित्य आणि समाज यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.
3) साहित्याद्वारे सामाजिक परिस्थतीचा अभ्यास करता येतो याबाबत आकलन करुन घेणे.
4) समाज परिवर्तनाला चालना देणारे साधन म्हणून साहित्याचा विचार करणे.
5) साहित्यातील समाजभिमुखता समजून घेणे.

या अनुषंगाने दुय्यम सामुग्री व निरीक्षण पद्धतीआधारे साहित्य आणि समाज यामधील परस्पर संबंधाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य हा शब्द उच्चारल्यानंतर एखाद्या विषयासंबंधी केलेले अथपूर्ण लिखण हा विचार आपल्या मनात उभा राहतो. साहित्याचा संबंध समाजाशी असतो. समाजाच्या मुशीतून साहित्यिकाची मानसिकता, वैचारिकता तयार होते. ॲलन स्विंगवूडच्या मते साहित्यिकांचा समाजिक दर्जा, समाजाप्रती त्याच्या अभिवृत्ती, सामाजिक जीवनाशी त्यांची बांधिलकी, जीवनात त्यांना आलेले यशापयश या सर्वाचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम त्यांच्या व्यक्तीमत्वावर व साहित्यावर पडतो. त्याद्वारे साहित्याचे स्वरुप निश्चित होते. साहित्य केवळ अमुर्त, काल्पनिक, भावनिक व चमत्कारीक ठरत नाही तर वास्तविक ठरते साहित्याद्वारे समाजातील विविध समुह, सामाजिक संस्था, सामाजिक स्तररचना, सामाजिक संबंध, सहकार्य, संघर्ष, अनुकूलन, प्रेरणा, अभिवृती इत्यादी पैलुबाबत ज्ञान मिळते.

कलावादी समीक्षक ना.सी. फडके, बा.सी.मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, पु.शि.रेगे, माधव आचवल, डॉ.द.भि. कुलकर्णी इत्यादी साहित्याकडे एक कलाकृती, सौंदर्यकृती म्हणून पहातात. खरेतर मानवी जीवन दुःख, कटु अनुभव, दाहकता इत्यादींनी व्यापले आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी माणुस साहित्याकडे वळतो. तेव्हा साहित्याद्वारे पुन्हा माणसाला दुःख देणे अयोग्य ठरते असे कलावादी साहित्यिक मानतात. जीवनवादी समीक्षक वि.स. खांडेकर, दि.के.बेडेकर, म.ना.वानखेडे, शरदचंद्र मुक्तीबोध, म.भी.चिटणीस, रा.ग.जाधव, गं.भा. सरदार, भालचंद्र फडके, नरहर कुरुंदकर, बाबुराव बागूल, रावसाहेब कसबे, यशवंत मनोहर इत्यादी साहित्याकडे जीवनवादी दृष्टिकोणातून पहातात. केवळ मनोंरजन करणे हा साहित्याचा उद्देश नाही तर मानवी प्रश्न व दुःखाला वाचा फोडणे, समाज सुधारणा घडवून आणणे महत्वाचे ठरते,

**Please cite this Article as :** *प्रा. डॉ. संजय दुधे* **,** *साहित्य आणि समाज : एक समाजशास्त्रीय दृष्टीकोण* **: Indian Streams Research Journal (JUNE ; 2012)**

असे जीवनवादी साहित्यिक मानतात. जीवनवादी साहित्याची मानवी मूल्यावर निस्सिम श्रद्धा आहे. त्याला मानवी मूल्यावर आरुढ झालेले समाज जीवन अभिप्रेत आहे. अलिकडील काळात या जीवनवादी साहित्याने समग्र समाज व्यवस्थाच ढवळून काढली आहे. या साहित्याला जीवनात व जगण्यात अर्थ वाटतो. त्यामूळे ते जीवन वास्तवाला सामोरे जाते, जीवनाची बुद्धीनिष्ठ चिकित्सा करते. समाजाचे प्रश्न समजून घेत. या साहित्यातील जीवनभिमुखता हीच या साहित्याला शक्ती व सामर्थ्य देऊ शकते.

'साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाज व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही. वाड्मयनिर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेत रुजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या विशिष्ट भाषेतील वाङमयीन व शैली विषयक परंपरा मोठया प्रमाणात कारणीभूत असतात.[1] लेखकाला तत्कलीन परिस्थीतीमध्ये जे बरे–वाईट अनुभव, येतात तो जे निरीक्षण करतो ते आपल्या लेखणीद्वारे अभिव्यक्त करतो. लेखकाचे समाजातील स्थान कोणते यावरुन त्याच्या साहित्याचित्रणाचे स्वरुप स्पष्ट होते. 'समाजाच्या स्थितिगतीशी व प्रतिभा शक्तीच्या प्रेरणेशी साहित्य निर्मिती निगडीत असते. जिला समाजाची संस्कृती समजण्यात येते, ती समाजातील विचारकल्पनांनी व कलावाङमयीन आविष्कारांनीच रुपास येते[2] साहित्याला परिस्थितीजन्य, संस्कृतिक, भावनिक, वैचारिक असे मुल्यात्मक अंग असते. कारण साहित्य स्वभावतःच समाजभिमुख असते. त्यात सामाजिक जाणिवेचे प्रतिबिंब उमटते, समाजाचे स्थितीचित्रण घडून येते. त्याहीपेक्षा त्यातून सामाजिक परिवर्तनाचे दर्शन घडते. समाजातील परपस्परविरोधी घटकांचे संबंध व्दव्दांत्मक असतात. त्यातील अंतिविरोधाची मूलगामी चिकीत्सा केल्यास ते साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरते. 'साहित्य हा संस्कृतीचा एक घटक असतो. याचा अर्थ साहित्यातून समाजाचे आणि संस्कृतीचे बाह्यरुपच नव्हे तर प्रेरणा, प्रवृत्ती, परंपरा यादेखील व्यक्त होतात.[3] झाडाची मुळे जमीनीतून अन्नद्रव्ये शोषून घेतात, वरवर पाहिले तर झाडाचा जमीनीशी संबंध नाही असे वाटते. परंतू जमीनीतील अन्नद्रव्याशिवाय झाडाची वाढ अशक्य असते. तसेच समाज व संस्कृतीशिवाय साहित्याचा उदय व विकास अशक्य असतो. अशी भुमिका जोसेफ रुसेक यांनी Sociology of Literature या ग्रंथात मांडली आहे. जोसेफ रुसेकच्या मते साहित्याचा समाजाशी असणारा संबंध पुढील पैलूंना अनुसरुन अभ्यासला जावा. साहित्यकृती का निर्माण केली गेली?त्याच क्षेत्रातील इतर साहित्यकृतींशी त्याचा काय संबंध आहे, विशिष्ट समस्येव्यतिरिक्त इतर कोणत्या आधारभूत मूल्यांचे प्रतिबिंब त्या साहित्यात पडले आहे. साहित्यिकाने अभिव्यक्तीचे कोणते माध्यम निवडले आहे? त्या साहित्याला कितपत व कशी मान्यता मिळाली आहे?याचाच अर्थ साहित्यनिर्मिती साहित्यिकाच्या निर्मीती क्षमतेचा परिपाक दिसत असली तरी समाज व त्या समाजाची संस्कृती यांचा त्या साहित्य निर्मितीमध्ये महत्वाचा वाटा असतो.

साहित्य हा समाजाच आरसा आहे असे म्हटले जाते. साहित्यिकाच्या साहित्यकृतीत समाजाचा एक सदस्य म्हणून त्याला आलेले अनुभव, सामाजिक घटनेचे त्याला होणारे प्रत्यक्षीकरण आणि बोध तसेच या सर्वांचे यथार्थ चित्रण करण्याची त्याची क्षमता आणि इच्छा यांचा प्रभाव साहित्यावर पडतो. साहित्यिक समाजविघातक शक्तिविरुद्ध सामाजिक चेतना निर्माण करण्याचे कार्य करतो. त्याद्वारे परिवर्तनाच्या सक्रिय प्रयत्नांना प्रेरणा मिळते. या अर्थाने साहित्यिक श्रेष्ठीजणांची भूमिका वठवतो. साहित्यिकाला परिवर्तनाच्या विविध प्रवाहाचे झालले आकलन, समाज जीवनाबाबतची आलेली समज, त्याची वैचारिक बांधिलकी इत्यादीच्या बळावर तो नवसमाज निर्मितींचे स्वप्न पहातो. समाजशास्त्रज्ञ आणि साहित्यिक यांच्यामध्ये मुलभूत फरक हा की, समाजशास्त्र वस्तुनिष्ठतेवर भर देऊन सामाजिक वास्तवतेचे चिकित्सक परिक्षण करतात तर साहित्यिक व्यक्तिनिष्ठ, संवेदनशील जाणिवेतून समाज जीवनाचे चित्रण करतात. साहित्य आणि समाज यामधील अंतःसंबंधाचे विश्लेषण समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळया दृष्टीकोणाद्वारे केले आहे.

एच.डी.डंकन ;भ्क् क्नदबंदद्ध यांनी आंतरक्रिया दृष्टिकोणाद्वारे एक स्वायत्त सामाजिक संस्था म्हणून विचार केला आहे. कोणत्याही साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा ही नेहमी साहित्यिक. समीक्षक वाचक यांच्यात होणाऱ्या आंतरक्रियावर आधारीत असते. या तीन घटकात होणाऱ्या आंतरक्रियांची तीव्रता नेहमी सारखीच नसते. कधी वाचक व लेखक यांच्यात घनिष्ठता तर कधी लेखक व समीक्षकात घनिष्ठता प्रस्थापित होते. परिस्थितीनुसार त्यांच्यातील संबंधाचे स्वरुप बदलते. साहित्याचे मूल्यामापन, समर्पक गुण, पैलू, सामर्थ्य व मर्यादांची उकल करण्यामध्ये समीक्षकांची भूमिका महत्वाची ठरते. साहित्यातील भावविचार वास्तविक अर्थासह वाचकापर्यंत पाहेचवण्याचे कार्य समीक्षक करतो. क्लिष्ट समाजव्यवस्थेत समीक्षकाची चिकीत्सक विचारदृष्टी अर्थपूर्ण ठरते, परंपरागत साध्या समाजव्यवस्थेत मात्र साहित्यिक आणि वाचक यांच्यात प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित होऊ शकतो.

जॉर्ज हुको (George Hoco) या समाजशास्त्रज्ञाने सामाजिक संरचनात्मक दृष्टीकोणाद्वारे साहित्य आणि समाज यामधील परस्पर संबंधाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते सामाजिक संरचनेत निर्माण होणारे असंतुलन विशिष्ट प्रकारच्या सामाजिक व मानसिक तणावांना जन्म देते. त्याची अभिव्यक्ती त्या कालखंडात निर्माण होणाऱ्या साहित्यामधून व्यक्त होते. या दृष्टिकोणाद्वारे आपण साहित्याच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट कालखंडातील सामाजिक ताणतणाव व त्यामागील कारणांचे अध्ययन करु शकतो. पाश्चिमात्यिकरण, औद्योगिकरण, नागरीकरण इत्यादीमूळे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक जीवनात जो ताणतणव व संघर्ष निर्माण झाला आहे. त्याचा प्रभाव आधुनिक साहित्यावर पडलेला दिसून येतो. त्यामुळे साहित्यिकास साहित्य निर्मिती करण्यास जी सामुहिक चेतना ;ब्वससमबजपअम ब्वदेबपवनेदमेद्ध प्रवृत्त करते त्याअर्थाने व व्यापक दृष्टिकोणातून साहित्याचे आकलन होणे महत्वाचे ठरते.

कार्ल मार्क्स यांनी समाज आर्थिक संबंधाच्या पायावर उभा असतो. अर्थव्यवस्था ही मुलभूत संरचना (Basic Structure) तर साहित्य हे अधिसरंचनेचा (Super Structure) भाग ठरते असे मानले आहे. परिस्थीती आणि वर्गीय जाणिवेला अनुसरुन साहित्यिक आपल्या भावना प्रकट करतो. आर्थिक स्थिती, वर्ग, वर्गीय जाणिव, वर्गीय हितसंबध, दारिद्रय, दुरावा, व्दंव्द, संघर्ष यासारख्या संकल्पनांना अनुसरुन मार्क्सवादी साहित्यिक आपली भूमिका स्पष्ट करतात. यासंदर्भात वि.स.जोग म्हणतात, 'मार्क्सवाद समाज परिवर्तन घडविणारे साहित्य उत्कृष्ट मानतो. नवे स्विकारण्याची प्रेरणा मार्क्स देतो म्हणून साहित्याने मार्क्सच्या प्रेरणेपासून दुर जाता कामा नये.'4 मार्क्सवादी प्रमेयांचा हेतू भांडवलशाही समाज व्यवस्थेतील दोषांची जाणिव करुन देऊन शोषितांना मूक्त करणे हा असला तरी आर्थिक प्रश्नाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक आस्मिता, प्रतिष्ठा हीपण तितकीच महत्वाची ठरते. कारण आर्थिकदृष्टया संपन्नता आली तरी सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होईलच असे नाही. भारतीय समाजात जातिव्यवस्था आहे. त्यामूळे येथे तंतोतंपणे मार्क्सवाद लागु पडत नाही असे काही साहित्यिकांना वाटते. म्हणून डॉ. सदा कऱ्हाडे सारखे साहित्यिक 'मार्क्स आणि आंबेडकरवादाच्या समन्वयानेच परिवर्तनाला गती येऊ शकते.5 यावर विश्वास ठेवतात. आंबेडकरी विचारातून निर्माण झालेली आस्मिता ज.वि.पवार यांना अस्वस्थ करुन टाकते. 'खरे म्हणजे रोज रात्री मार्क्स मला थोपटून झोपवतो तर आंबेडकर मात्र आतडयांत लाव्हा भरुन खडबडवतो.[6] या अनुषंगाने प्रा. नलिनी पंडीत म्हणतात, 'मार्क्स ज्याला पिळवणूक म्हणतात तेच बौद्ध धर्मातील पहिले आर्यसत्य दुःख आहे, या दुःखाला कारणे आहेत, त्याचे निराकरण करता येते आणि त्याचे

निवारण करण्याचा मार्ग उपलब्ध आहे. या बाबतीत मार्क्स आणि बुद्ध यांच्यामध्ये साम्य आहे.7 भौतिकता अनिश्वरवाद, अनात्मवाद, इहवाद याबाबतीत हे साम्य लक्षात येते. म्हणूनच दया पवार यांना 'एखादा माणुस एकाचवेळी बुद्ध आणि मार्क्स यांच्या तत्वज्ञानाचा स्विकार करु शकतो,8 असे वाटते.

प्रस्तुत विवेचनात साहित्य आणि समाज यामधील अंतःसंबंधाची दलित साहित्याच्या आधारे समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. दलित साहित्य हे प्रत्यक्ष जीवन अनुभवातून निर्माण झाले असून ते जीवननिष्ठ आहे. दलितांच्या जीवनाचा आणि दलित साहित्याचा प्रत्यक्ष घनिष्ठ संबंध आहे. त्यामूळे दलित साहित्याचा वाङमयीन किंबहुना त्याहीपेक्षा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करणे महत्वाचे ठरते. हे सांगताना समाजशास्त्राचे अभ्यासक प्रा.डॉ. प्रकाश बोबडे म्हणतात, 'महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर यांच्या लिखानात सामाजिक समतेच्या मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. या साहित्यिकांचे लिखाण आज देखील या मूल्यांच्या प्रसाराच्या दृष्टीने प्रेरणादायक आहे. स्वातंत्र्योतर काळातील दलित साहित्य चळवळीची बिजे याच लिखाणात शोधता येतील. त्या काळातील व आजही आढळून येणाऱ्या सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब आपणास या साहित्यात दिसते.9 दलित साहित्याकांनी सामाजिक जाणिवेतून आपले जीवनानुभव अभिव्यक्त केले आहेत. त्यामुळे त्यांची अभिव्यक्ती व्यक्तिकेंद्री नसून समूहकेंद्री रुप धारण करते. कष्टप्रद जीवन जगणारा, गावगाडयात प्रत्यक्ष    कृतिशील भूमिका पार पाडणारा दलित माणूस उपेक्षित राहिला?तो संवर्णाच्या दयेवर का अवलंबुन आहे याचा दलित साहित्यीक शोध घेताना दिसून येतात.

दलित साहित्य आणि दलित स्वकथने याबाबत समाजशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ.एस.पी. पुनाळेकर म्हणतात, 'दलित लेखक साधारपणे वास्तव, गतिशील, जिवंत सामाजिक प्रक्रियेला अधिक जवळ असतात. ते स्वतः वास्तवतेत सहभागी असतात. अनुभवसिद्ध पद्धती आणि आशय याबाबत दलित आत्मकथने खुपच समृद्ध आहेत. यात सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरांचे विशेषतः तळातल्या विविध जाती यांच्यातल्या जीवनाबद्दल विश्वासार्हय माहिती मिळते. सांस्कृतिक कप्पे, दुभंगलेले सामाजिक जीवन, त्यांचे कौटुंबिक जीवन, जातीव्यवस्थेतील गट आणि चळवळी करणाऱ्या सक्रीय संघटना या सर्वाची वैचारिक प्रक्रीया, स्वाभाविक प्रतिक्रीया कशा होतात, या सर्वाच्याबद्दल सत्यावलोकनाची दृष्टी प्राप्त होऊ शकते.10 दलित साहित्यिक स्वतःच सामाजिक, सांस्कृतिक भेदाचे बळी ठरले आहेत. त्यामूळे त्यांनी आपल्या अपमानित जीवनाचे सुक्ष्म निरीक्षण करुन विश्लेषण केले आहे. दलित साहित्यिकांचे आकलन कोणते आहे. ते सभोवतालचे वास्तव कसे व्यक्त करतात, हे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून समजून घेणे महत्वपूर्ण ठरते. 'समाज हाच ज्यांचा अभ्यासविषय आहे. अशा आधुनिक सामाजिक विज्ञानांना आणि तत्वज्ञांना कला वाङ्मयाचा अभ्यास करणे अलिकडे आवश्यक वाटत आहे. सामाजिक संरचना, सामाजिक परंपरा, सामाजिक परिवर्तन, व्यक्ती आणि समाज याचा परस्पर संबंध, कुटुंबजीवन, समाजकार्य, समाजसेवा, समाजकल्याण, समाजव्यवस्था इत्यादी अनेक विषय सामाजिक विश्लेषणाचे अभ्यास विषय आहेत.11

शेकडो वर्षापासून पशुवत जीवन जगणाऱ्या दलित समाजाला आंबेडकरी विचारामुळे स्वत्व आणि आस्मितेची जाणिव झाली. आपणही इतरांसारखे माणसे आहोत, असे त्यांना वाटू लागले. त्यातून दलित साहित्य उदयास आले. हे साहित्य अनुभवजन्य, वास्तववादी आहे. म्हणूनच दलित साहित्य हा आपल्या बौद्धिक चर्चेचा विचारमंथनचा विषय झाला आहे. दलित साहित्याद्वारे मराठी साहित्य समृद्ध व वास्तववादी बनण्यास मदत झाली. या साहित्याच्या समाजशास्त्रीय अध्ययनाद्वारे दलितांचा जीवनविषयक दृष्टिकोण, भावना, जाणिवा, अभिवृत्ती, ताणतणाव, संघर्ष, सामाजिक परिवर्तन इत्यादी बाबी समजून घेता येतात. 'महाराष्ट्रातील (आणि आता गुजरात, कर्नाटकातील) दलित आमचरित्रामधून तळागाळातील वर्गाच्या सामाजिक सत्य स्वरुपावर गुंतागुंतीच्या मुलभूत व्यवस्थेवर प्रकाश टाकणाऱ्या अनेक गोष्टी आपल्याला कळून येतात. यामधून समाजशास्त्राच्या अभ्यासकांना त्यांच्या आजवरच्या औपचारिक, साचेबंद, दृढमुल झालेल्या समाज संस्कृती आणि राजकीय वैचाारिक बैठकीला कदाचित वेगळे वळण दयावे लागेल.12 दलित साहित्याचा समाजशास्त्रीय अध्ययनाशी सखोल, व्यापक व बहुआयामी संबध आहे. या साहित्याची समीक्षा करताना वाङ्मयिनतेपेक्षा सामाजिकतेला महत्व दिल्याने ''इसमे समाजशास्त्र का अध्ययन प्रमुख और साहित्य या कला का पक्ष गौण हो जाता है! साहित्य के अध्ययन का लक्ष्य, समाजशास्त्र के सिद्धांतो और संदर्भो के प्ररिप्रेक्ष्य में साहित्य का विवेचन ही हो सकता है और होना चाहिए.''13 असे डॉ. नगेन्द्र यांनी 'साहित्य का समाजशास्त्र' या ग्रंथात प्रतिपादन केले आहे.

साहित्यिक हा समाजाच्या सृजनशील शक्तीचा प्रतिनिधी असतो. दलित साहित्यिकांनी समाज जीवनाचे उत्कृष्ट चित्रण केले आहे. त्यामूळे समाज जीवनाची अपरिचित बाजू नव्या जाणिवेतून समाजासमोर आली. दलित साहित्यिकांनी 'दलित' म्हणून आलेली जीवनविषयक अनुभूती सामाजिक जाणिवेतून अभिव्यक्त केली. यामूळे दलित साहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून 'साहित्यकृती' म्हणून नव्हे तर 'सामाजिककृती' म्हणून अध्ययन करावे लागेल. वर्ण, जात, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, शोषण, दैववाद, गुलामगिरी इत्यादीला नकार देऊन मानवी मुल्यावर आधारित समाज व्यवस्थेची उभारणी करु इच्छिणारे दलित साहित्यिक मी कोण?कसा घडलो?समाज व्यवस्थेत आपले स्थान काय? याचा शोध घेताना दिसून येतात. म्हणूनच प्राचार्य नरहर कुररुंदकर म्हणतात, 'दलित साहित्य ही मी केवळ वाङ्मयीन चळवळ समजत नाही तर ही एक जीवनदृष्टी मानतो.14

दलित साहित्याचा विचार हा केवळ साहित्यिक परंपरेचा नसून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा विचार आहे. साहित्य केवळ भावनांचे काहूर उठविणारे नाही तर परिवर्तनाच्या पातळीवर समाजमन गतिमान बनविणारे आहे. 'विद्रोह' ही या साहित्याची प्राणधारणा आहे. हा विद्रोह केवळ निषेधात्मक व नकारात्मक नसून मानवी मूल्य प्रतिष्ठापणेसाठी आहे. दलित साहित्याने नकार व विद्रोहाकडून प्रभावीपणे मानवतेकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. असे सुचविताना बालकृष्ण कवठेकर म्हणतात, 'माणसाने माणूस म्हणून जगणे आणि जगू देणे म्हणजे मानवतावाद. दलित साहित्याने ही भूमिका समजून उमजून स्वीकारली तर संदर्भांनी घेरलेल्या दुःख पलीकडे असलेल्या माणासाच्या सनातन दुःखाची व जगण्यासाठी चाललेल्या ताच्या सनातन संघर्षाची त्याला जाणिव होईल. या दुःखातून आणि संघर्षातूनच ज्यामूळे ते चिडून उठले ते संदर्भ निर्माण होत असतात. तेही त्याच्या ध्यानात येईल. या मुलभूत जाणिवेतून जीवनाचा शोध आणि आविष्कार करु लागलेले दलित साहित्य अधिक मुलभूत आणि उदारदृष्टी धारण करु शकेल आणि मग ते नुसत्या दलितांचे नव्हे तर समग्र मानवतेचे साहित्य होईल.'[15] या अर्थाने दलित साहित्य मानवतेशी चाललेल्या व्यापक चळवळीशी संबंधीत आहे. जगात सर्वश्रेष्ठ कोण असेल तर तो 'माणूस' माणसापूढे सर्व काही दुय्यम आहे. दलित साहित्याने 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला आहे हे साहित्य समाजिक परिर्वनाचे ध्येय बाळगून वाटचाल करताना दिसून येते. परिवर्तन प्रक्रियेत संघर्ष हा अपरिहार्य असतो. संघर्ष आणि परिवर्तनाला पोषक ठरणाऱ्या जाणिवा विकसीत करण्यासाठी दलित साहित्याद्वारे प्रेरणादायी विचार अभिव्यक्त होताना दिसून येतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून साहित्याचे विवेचन केल्यानंतर काही निश्चीत झालेली मते मांडता येतील.

1)साहित्याचे वाङ्मयीन दृष्टिकोणातून नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अध्ययन केल्यामूळे आजपर्यंत प्रकाशात न आलेली व इतरत्र

सहजपणे न मिळणारी माहिती मिळू शकते. साहित्याचा आधार घेऊन समाजशास्त्रीय अध्ययन करणे शक्य होते.
2)साहित्य आणि समाज यांच्यातील अंतः संबंध घनिष्ठ व अतूट स्वरुपाचा आहे.सामाजिक परिस्थितीतून साहित्य उदयास येते, विकसीत होते ही बाब आता सर्वमानय झाली आहे.
3)साहित्याद्वारे सामाजिक परिस्थितीचे यथार्थ आकलन करता येते. कारण साहित्यिक ज्या समाज व्यवस्थेत व संस्कृतीत रहातो. त्याचा प्रभाव त्याच्या विचारसरणीवर पडतो. समाजातील सामाजिक संस्था, सामाजिक संबंध, सामाजिक समस्या इत्यादीचे साहित्याआधारे अध्ययन करणे शक्य होते.
4)आधुनिक साहित्य सामाजिक परिवर्तनास प्रेरणा देणारी भूमिका स्विकारत आहे. त्यामूळे साहित्याची क्रियाशीलता व समाजभिमुखता विकसीत होण्यास चालना मिळत आहे.
5)साहित्य हे मुलतः समाजन्मुख असते. सामाजिक परिस्थितीला अनुसरुन लेखकाचे भावविश्व, विचारविश्व तयार होते. त्यानुसार तो आपला दृष्टिकोण मांडतो. त्यामुळे साहित्यातील सामाजिकतेचा समाजशास्त्रीय दृष्टीने अलगडा करणे शक्य होतो.
6)साहित्याच्या समाजशास्त्रीय अध्ययनामुळे समाजशास्त्रीय विचाराच्या चालना मिळते. तसेच साहित्याची समाजशास्त्रीय चिकीत्सा केल्यामुळे साहित्य निर्मितीस नवी दिशा प्राप्त होते, साहित्याचा दर्जा उंचावण्यास मदत होते.

या समग्र विवेचनावरुन प्रकर्षाने जाणवते की, साहित्यिक आपल्या जीवनानुभवाद्वारे व्यापक वास्तवतेचा शोध घेतात. साहित्यामध्ये जो आशय अभिव्यक्त झाला आहे. त्याचे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अध्ययन झाल्यास 'साहित्याचे समाजशास्त्र' ही ज्ञानशाखा विकसित होण्यास मदत होऊ शकेल.

*संदर्भ :*

1) सोमण अंजली – साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र.आ.1982, पृ.12
2) जाधव रा.ग. – साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉनिटनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. 1975, पृ. 88
3) जाधव रा.ग.– कला, साहित्य आणि संस्कृती, सुगंधा प्रकाशन, पुणे प्र. आ. 1986, पृ.8–9.
4) जोग वि.स. – मार्क्सवाद आणि दलित साहित्य, संबोधि प्रकाशन, मुंबई प्र. आ. 1985, पृ.32
5) कुऱ्हाडे स.दा. – दलित साहित्याच्या निर्मित्ताने, अभिनव प्रकाशन, मुंबई प्र.आ. 1982, पृ. 15
6) पवार ज.वि. – नाकेबंदी, मुक्तछंद प्रकाशन, मुंबई प्र.आ. 1976, पृ. 30
7) पंडीत नलिनी – स्वांतत्र्योतर काळातील दलितांचा प्रश्न, साधना प्रकाशन, पुणे, पृ. 92
8) पवार दया – माझे शब्द, कोंडवाडा, मागोवा प्रकाशन, पुणे प्र.आ. 1994, पृ.12
9) बोबडे प्रकाश – साहित्य आणि समाज, अप्रकाशित शोधनिबंध, मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन, जळगाव दि. 7 –9 नोव्हे. 1993
10) पुनाळेकर एस.पी. – शोधनिबंध, दलितांच्या आत्मचरित्राचे समाजशास्त्र, मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशन, जळगाव दि. 7–9 नोव्हे. 1993
11) जाधव रा.ग. – कला साहित्य आणि संस्कृतीक, पुर्वोल्लेखित, पृ. 19
12) पुनाळेकर एस.नी. – पुर्वोल्लेखित
13) नगेन्द – साहित्य का समाजशास्त्र, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, नयी दिल्ली, प्र. आ. 1982, पृ.4
14) प्राचार्य कुरुंदकर नरहर– निकाय, नागपूर, एप्रिल 1976 पृ. 59
15) कवठेकर बालकृष्ण – वाङ्मय चर्चा आणि चिकित्सा, नवसाहित्य प्रकाशान, बेळगाव प्र. आ. 1978, पृ.19

**Please cite this Article as :***प्रा. डॉ. संजय दुधे* **,** *साहित्य आणि समाज : एक समाजशास्त्रीय दृष्टीकोण* **: Indian Streams Research Journal (JUNE ; 2012)**